# बारामती नगरपरिषद, बारामती

| वाचा - | |
|---|---|
| १) | 'अ','ब' व 'क' वर्ग नगरपरिषदेसाठी प्रमाणीत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली |
| २) | महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १८९ अन्वये |
| ३) | अर्जदार यांचा दिनांक २८/०३/२०१८ रोजीचा दाखल अर्ज |

## - प्रारंभ प्रमाणपत्र -

प्रमाणपत्राचा क्रमांक २७/२०१८-२०१९ दिनांक ११/४/२०१८
२१/४/२०१८

अर्जदार बंडा शंकर ढाळे यांनी नगरपरिषद हद्दीमधील मौजे जळोची, गट नं.१७१/७/२, प्लॉट नं. २ या जागेमध्ये इमारत क्र. ऐ - तळघर,तळमजला + दोन मजले व इमारत क्र. बी - पार्किंग + पाच मजले या बांधकाम नकाशांना मंजुरी मिळणेकरीता दिनांक २८/०३/२०१८ रोजीच्या अर्जान्वये व दाखल केलेल्या कागदपत्रावरुन पूढील अटी व शर्ती अर्जदारावर बंधनकारक ठेवुन सोबतच्या मंजुर नकाशा वरहुकूम वाणिज्य + रहिवास वापरासाठी बांधकाम सुरु करणेसाठी प्रमाणपत्र देणेत येत आहे.

१) प्रस्तावित इमारतीचे बांधकाम नकाशात दर्शविलेप्रमाणे वाणिज्य + रहिवास वापरासाठी तसेच प्रचलित नियमावलीतील अनुज्ञेय असलेल्या कारणासाठी वापरणे आवश्यक आहे.

२) स्थलदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासुन पूढील, मागील व बाजुची अंतरे प्रत्यक्षात जागेवर कायम ठेवणे आवश्यक असुन सदर जागा कायम खुली ठेवणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

३) नियोजित बांधकामाचे एकुण क्षेत्र नकाशात दर्शविलेप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर राहिले पाहिजे.

४) नियोजित बांधकामातील मजल्यांची संख्या नकाशात दर्शविलेप्रमाणे इमारत क्र. ऐ - तळघर,तळमजला + दोन मजले व इमारत क्र. बी - पार्किंग + पाच मजले याप्रमाणे ठेवणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

५) नियोजित इमारतीसाठी आवश्यक असणा-या पाण्याची सोय व सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची व्यवस्था नसल्यास प्रत्यक्ष वापरापूर्वी अर्जदाराने करणे बंधनकारक राहील.

६) इमारतीच्या टेरेसवरील पावसाचे पाणी जमिनीत सोडणे व जिरवणेची स्वतंत्र व्यवस्था (Rain Water Harvesting) करणेची जबाबदारी अर्जदारावर बंधनकारक राहील.

७) उक्त जागेवर सौर उर्जेवर पाणी तापविणेसाठी यंत्रणा अर्जदार यांनी स्वतः स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.

८) प्रकाश व वायुविजन यासाठी ठेवलेल्या खिडक्यांचे क्षेत्र हे त्या संबंधीत खोलीच्या १/१० पेक्षा कमी असु नये.

९) विषयांकित जागेतुन उच्च दाबाची विद्युत वाहिनी जात असल्यास संबंधीत वाहिनीपासून सोडावयाच्या सुरक्षा अंतराबाबत संबंधीत खात्याचा सक्षम प्राधिका-याकडुन नाहरकत दाखला घेण्यात यावा व त्याप्रमाणे आवश्यक ते सुरक्षा अंतर सोडणेत यावे.

१०) विकासाचे काम चालु असताना इमारत व बांधकाम व्यवसायातील कामगार यांच्या सुरक्षितता व अन्य याबाबतच्या शासनाच्या कामगार विभागाने निर्गमित केलेल्या नियम / परिपत्रक / प्रचलित आदेश यांची जमिनमालक / विकसक यांनी पालन करणे बंधनकारक राहील. तसेच याबाबतचे पालन न केल्यास अर्जदार / विकसक यांचेवर कायदेशीर कारवाई करणेत येईल.

११) नियोजित बांधकामामुळे भूखंडावर असणा-या कोणाच्याही वहिवाटीच्या हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी जागामालक यांचेवर राहील.

१२) विषयाधिन भूखंडावरील प्रस्तावित बांधकाम जोतेपर्यंत पूर्ण झालेनंतर संबंधीत कामाचे इंजिनिअर / आर्किटेक्ट यांनी जोते प्रमाणपत्र नगरपरिषदेकडे सादर करणे बंधनकारक राहील. त्याची संपुर्ण जबाबदारी परवानाधारक यांचेवर राहील.

१३) विषयांकित बांधकाम नकाशामध्ये गणितीय चुका असल्यास त्यास सबंधीत वास्तुशिल्पी व अर्जदार जबाबदार राहतील.

१४) मंजुर बांधकाम नकाशानुसार बांधकाम जागेवर पूर्ण झालेनंतर वापर सुरु करणेपूर्वी आर्किटेक्ट / इंजिनिअर यांनी बांधकाम पुर्णत्वाचा दाखला तसेच स्ट्रक्चरल इंजिनिअर यांनी इमारतीचा स्ट्रक्चरल अहवाल सादर करुन अर्जदार यांचे सहीने रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र करुन भोगवटा प्रमाणपत्र मिळणेसाठी नगरपरिषदेकडे अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

१५) अर्जदाराने दाखल केलेली कागदपत्रे व माहिती खोटी अगर दिशाभूल करणारी निदर्शनास आलेस सदरची बांधकाम परवानगी रद्द समजणेत येईल. त्यास अर्जदार जबाबदार राहतील.

१६) मा. डायरेक्टर ऑफ फायर सर्व्हिस, महाराष्ट्र फायर सर्व्हिस अॅकडमी, मुंबई यांचेकडील प्रोव्हीजनल नाहरकत प्रमाणपत्र क्र.एमएफएस/००१९/१६/५१४,दि.२९/०९/२०१६ यामधील दिलेल्या सर्व अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.

१७) नगरपरिषदेस रस्ता रुंदीकरणातील बाधीत क्षेत्र हस्तांतरण दस्त करुन दिलेप्रमाणे सदर क्षेत्र ६८१.१४ चौ.मी. रस्तारुंदीकरणासाठी खुले सोडून भूखंडाची त्याप्रमाणे मोजणी करुन बांधकाम सुरु करावे.

१८) सदर बांधकामातील स्ट्रक्चरल बाबीं अर्जदार यांनी सक्षम स्थापत्य अभियंता, स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचे डिझाईन व मार्गदर्शनाखाली काम करणेत यावे.

BARAMATI NAGARPARISHAD बारामती नगरपरिषद

(मंगेश चितळे)
मुख्याधिकारी गट- अ
तथा नियोजन प्राधिकारी
बारामती नगरपरिषद, बारामती